# ग्राम पंचायत पाळा पं.स नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती

दिनांक ; १७/०९/२०२५ रोजी झालेल्या विशेष ग्रामसभा

ग्रामसभा /मासिक सभा /वार्ड सभा /समितीच्या बैठीकीचे इतिवृत्त नोंदवही

१ )ग्रामपंचायतचे नाव :पाळा ता .नांदगाव खंडेश्वर जिल्हा .अमरावती

२) सभेचा वेळ :११०० ३ ) सभेचा क्रमांक ४ ४)सभेची तारीख :१७/०९/२०२५

५ )सभेचे स्थळ: ग्रामपंचायत कार्यालय पाळा

६)सभेची कोणी सन्माननीय गृहस्थ अगर अधिकारी हजर असल्याची नोंद (हुद्यासह)

७ )सभेचे अध्यक्ष मान्यवर :श्री पंकज मेटे (सरपंच)

दिनांक १७/०९/२०२५रोजी मा. श्री पंकज मेटे सरपंच यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या

विशेष ग्रामसभा बैठक /सभेतील उपस्थिती खालीलप्रमाणे आहे .

| अ .क्र | सभेस उपस्थिती अधिकारी /कर्मचाऱ्याचे नाव | हुद्या | भ्रमण ध्वनी | ई-मेल आयडी | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|
| १) | कु एस वाय कांडलकर | ग्रा.से | | | |

| अ क्र | सभेस उपस्थित पंचायत सदस्य/ग्रामस्थाचे नाव | भ्रमणध्वनी | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| | ग्रामसभेला उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांची नावे हजेरी रजिस्टरवर घेण्यात आली . | | ग्रामसेवक उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांच्या सह्या हजेरी रजिस्टरवर घेण्यात आल्या. |

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करिता आलेले विषय व ठराव | शेरे आणि तारखेसह ठरावाची अंमलबजावणी |
|---|---|---|---|
| ठराव क्र | ०९ | आज दिनांक १७/०९/२०२५ रोजी दिनांक च्या नोटीसने सूचित केल्या प्रमाणे श्री पंकज मेटे यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी ११.०० वाजता ग्रा.पं कार्यालयात विशेष ग्रामसभेचे आयोजन केले असता खालील विषयावर कामकाज चालविण्यात आले .<br><br>**ध्वनीप्रदूषण रोखण्याबाबच्या उपाययोजना करून ग्रा.प पाळा येथे ध्वनीप्रदूषण(नियमन व नियंत्रण )नियम २०००ची अमलबजावणी करणेबाबत**<br>**सुचक:पंकज मेटे अनुमोदक सौ नागपुरे**<br>आजच्या सभेत सचिवाचे ग्रा.प.पाळा येथे ध्वनीप्रदूषण रोखण्याबाबच्या उपाययोजना करून ध्वनीप्रदूषण(नियमन व नियंत्रण )नियम २०००ची अमलबजावणी करणेबाबत<br>विषय सभेसमोर चर्चेकरिता ठेवला असता त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .<br>चर्चेअंती शासननिर्णय क्र ध्वनीप्रदूषण २००९ प्र क्र १२/०८/ता क्र १ दिनांक ५ सप्टेंबर २०१६नुसर ध्वनीप्रदूषण (नियमन व नियंत्रण ) २००० च्या नियम ५ (३) नुसार ध्वनीश्रेपक व ध्वनीवर्धक यांचा वापर श्रोते गृह सभागृह सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यांसारख्या बंद जागा खेरीज इतर ठिकाणी फक्त ध्वनीची ,विहित मर्यादा राखून सकाळी ६ बाजल्यापासून रात्री १२ वाजेपर्यत करता येईल वरीलप्रमाणे ध्वनीश्रेपक व ध्वनीवर्धक वापरण्याबाबची सुट १५ दिवसापेक्षा जास्त होणार नाही व हि सूट शांतता श्रेत्रात लागू नसल्याने त्यांची अमलबजावणी करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची राहील करिता ग्रामपंचायत पाळा येथे ध्वनीप्रदूषण रोखण्यास हि सर्वानुमते मंजुरी देत आहे .<br>**ठराव नं ०९ मंजूर** | मंजूर |

सचिव

Scanned with OKEN Scanner



# ग्रामपंचायत कार्यालय




पाळा, ता.नांदगांव (खंडे), जि. अमरावती

| * सरपंच * | * उपसरपंच * | * सचिव * |
|---|---|---|
| श्री. पंकज भानुदास मेटे | श्री. रविंद्र पंजाब खोंड | कु. एस.वाय. कांडलकर |
| मो. 8975886089 | | |

जा.क्र

दिनांक : 01/04/25

Email.gppala6340@gmail.com

Webside: https://gppala.com


## जाहीर आवाहन

### ध्वनी प्रदूषण नियंत्रण व नियमन अतिसूचना

ग्रामपंचायत हद्दीतील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की ग्रामपंचायत पाळा हद्दीत माजी वसुंधरा अभियान ६.० ची अंमलबजावणी सुरू असून त्याकामी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी व प्रदूषणास आळा बसावा यासाठी उपाययोजना सुरू आहेत.

वरील प्रमाणे ध्वनीप्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २०००च्या नियम ५ (३) नुसार ध्वनीप्रदूषणास आळा घालून सदर नियमाची अंमलबजावणी सर्व नागरिकांमार्फत करण्यात यावी ही विनंती.

सचिव
ग्रामपंचायत, पाळा
पं.स.नांदगांव खंडेश्वर



# ग्रामपंचायत कार्यालय



पाळा, ता.नांदगांव (खंडे), जि. अमरावती


| * सरपंच * | * उपसरपंच * | * सचिव * |
|---|---|---|
| श्री. पंकज भानुदास मेटे<br>मो. 8975886089 | श्री. रविंद्र पंजाब खोंड | कु. एस.वाय. कांडलकर |

जा.क्र. Email.gppala6340@gmail.com

दिनांक : 01 /04/25

Webside: https://gppala.com


## जाहीर आवाहन

### परदेशी फटाके विक्री वापर बंदी अधिसूचना

ग्रामपंचायत हद्दीतील फटाके विक्री व वापर करणारे व्यावसायिक तसेच नागरिक यांना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत पाळा हद्दीत माजी वसुंधरा अभियान ६ .० ची अंमलबजावणी सुरू असून त्याकामी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी व प्रदूषणास आळा बसावा यासाठी उपाययोजना सुरू आहे. दिवाळी सणादरम्यान असणारा फटाक्यांचा वापर हा जास्त प्रमाणात केला जातो, मा. शासन निर्णय परिपत्रक क्रमांक संकीर्ण १०२/सी -१८६/पोल-९ यानुसार परदेशातून आयात केलेले फटाके विक्री व त्यांचा वापर यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. तरी येणाऱ्या दिवाळीत परदेशी फटाक्याची विक्री अथवा वापर करू नये, यंदाची दिवाळी पर्यावरणपूर्वक म्हणजेच इकोफ्रेंडली साजरी करायची असल्याने ग्रामपंचायत पाळा मार्फत परदेशी फटाके विक्री व वापर करण्यावर बंदी करण्यात येत आहे.

माजी वसुंधरा अभियान ४.० व स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ अंतर्गत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार ज्या फटाक्यांमध्ये बेरियम साल्ट, लिथियम असेर्निक लीड मक्युरी सारखे घटक असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे .या घटकांमुळे विषारी वायू प्राणी व वनस्पती या दोघांना घातक आहे चला तर आपण सर्वांनी मिळून पर्यावरणपूर्वक पर्यावरणास्नेही व प्लास्टिक मुक्त दिवाळी साजरी करूया.

सचिव
ग्रामपंचायत, पाळा
पं.स.नांदगांव खंडेश्वर